H.No.53
Amount Rs. 10/-
(Rs. Ten Only)
Dt. 24/02/2026
A.S.

# जाहीरनामा

वारसाचे सर्टिफिकेटाबददल

जाहीरनामा **कवठेमहांकाळ येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे कोर्टात (श्रीमती.एन.एस.कदम यांचे कोर्टात )**

वकील –सी.ए.शिंदे

दवंडी फी-रुपये १० /- जी नंबर ८३ दि. १८/०२/२०२६

ने.तारीख
०२/०३/२०२६

दिवाणी किरकोळ अर्ज नं - ५२/२०२५
निशानी क्र -१०

ज्यापेक्षा **कै. अमोल बबन लांडगे ,** हे मौजे इरळी , ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली येथील कायमचे रहिवासी होते. हे ता. २१/१२/२०१२ रोजी व त्या सुमारास इरळी, ता. कवठेमहांकाळ, येथे मयत झाले आहेत. तरी **लक्ष्मी बबन लांडगे** हयाने हया कोर्टात सहरहू मयत **कै. अमोल बबन लांडगे** याचे वारस असलेबदृदल वारसा दाखला मिळणेसाठी अर्जदार **१.लक्ष्मी बबन लांडगे , २. श्री.बबन पांडू लांडगे दोघे रा. इरळी, ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली** यांनी मे.कोर्टात बॉम्बे रेग्युलेशन VIII ऑफ १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू मयताचे अर्जदार – **१. लक्ष्मी बबन लांडगे , २. श्री.बबन पांडू लांडगे दोघे रा. इरळी, ता. कवठेमहांकाळ, जि.सांगली,** हे नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे कायदेशीर वारस असलेबददलचे वारसाचे सर्टिफिकेट देईल.

आज दिनांक २१ माहे ०२ सन २०२६

हुकूमावरुन,
सहा.अधिक्षक,
दिवाणी न्यायालय कवठेमहांकाळ.

Civil and Criminal Court, Kavathe Mahankal Tal. Kavathe Mahankal Dist. Sangli
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कवठेमहांकाळ
जि. सांगली

**बजावणीस श्री. बी. टी. साळुंखे**
**बेलिफ यांचेकडे दिले ता.** 24/02/26
A.S.

मा. कवठेमहांकाळ येथील दिवाणी न्यायाधीशसो क.स्तर, कवठेमहांकाळ यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज ५१/२०२५

निशाणी क्रं : ९०

---

बेलिफ रीपोर्ट

हुकुमाप्रमाणे आज रोजी इरळी येथे येवून सदरहू दिवाणी न्यायालय क.स्तर कवठेमहांकाळ यांचे कोर्टातील दि.कि.अर्ज नं. ५१/२०२५ नि. ९० लगत चे वारस जाहिरनामेतील मयत कै. अमोल बबन लोंढे हे दि. २१ / १२ / २०१२ रोजी किंवा त्या-सुमारास मौजे इरळी ता.कवठेमहांकाळ येथे मयत झाले आहेत. त्यांचे वारसा दाखल मिळणेकरीता यातील अर्जदार १) लक्ष्मी बबन लोंढे 2) बबन पांडू लोंढे दो. रा. इरळी ता. कवठेमहांकाळ जि. सांगली ........................................................ यांनी या मे.कोर्टात बॉम्बे रेग्यु.ॲक्ट १८२७ चे कलम ७४ प्रमाणे वारसा दाखला मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे सदर मयताचे कायदेशीर वारसदार नव्हेत/नाहीत असे कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झालेपासुन एक महिनेचे आत अगर नेमले तारखेस (नेम.ता. २/३/२०२६ रोजी) आपल्या तक्रारी/हरकती या मे.कोर्टात समक्ष हजर राहुन अथवा आपल्या वकिला मार्फत हजर राहुन तक्रारी कळवाव्यात जर सदर मुदतीत कोणाची काही तक्रार अगर योग्य हरकत न आलेस सदर न्यायालय अर्जदार यांना त्यांचा हक्क शाबात दिसल्यास तसे त्यांना वारसा दाखला देतील अशा मजकुराची दवंडी गावात प्रसिध्द ठिक--ठिकाणी व चावडीसमोर/ग्रा.पंचायत समोर देवुन त्याची एक प्रत मयताचे घरास व एक प्रत चावडी/ग्रा.पं.चे नोटीस बोर्डावर डकविले आहे. सदर जाहिरनामा प्रसिध्द केलेबद्दल दवंडीदार/~~गाव कामगार कोतवाल~~ यास दवंडी रक्कम रु. १०/-(दहा) मात्र रोख दिले आहे. त्याबद्दल दवंडीदार यांनी वेगळी दवंडी पावती दिली आहे. ती सोबत हजर ठेवली आहे.

मे.जा.व्हावे ता. २४/०२/२०२६

(सही)
बेलिफ

पुन्हा बेलीफ रिपोर्ट

सदरहु जाहिरनामेची एक प्रत मे.कोर्टाचे नोटीस बोर्डावर डकवुन प्रसिध्द केले आहे.

मे.जा.व्हावे ता. २६/०२/२०२६

(सही)
बेलिफ

रिपोर्ट सहा.अधिक्षक यांचा

सदरहु जाहिरनामेची बजावणी योग्य प्रकारे प्रसिध्दी झाली आहे. सोबत दवंडीदार यांची दवंडी पावती हजर ठेवली आहे.

मे.जा.व्हावे ता. २६/०२/२०२६

(सही)
A.S.

## दवंडी पावती
**मा.दिवाणी न्यायाधीशसो.,क.स्तर, कवठेमहांकाळ यांचे न्यायालयात**

**वारस सर्टीफिकेट अर्ज नं. ५२/२०२४**

**नि. -१०--**

यात मी खाली सही करणार दवंडीवाला रा.-इरळी---- लिहून देतो की, दवंडी पावती

सदरहू वारस जाहीरनामेतील मयत कै अमोल बबन लोंढे---- रा--इरळी--- ता.कवठेमहांकाळ जि.-सांगली---- हा दिनांक २१/१२/२०१२-- रोजी किंवा त्या सुमारास इरळी---ता-कवठेमहांकाळ जि--सांगली-- येथे मयत झाला आहे. आणि अर्जदार १. श्री/सौ-लक्ष्मी बबन लोंढे---------- यांनी सदर मा.दिवाणी न्यायाधीशसो. क.स्तर कवठेमहांकाळ यांचे न्यायालयात सदर मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वारस सर्टीफिकेट अर्ज नं-५२/२०२४ नि.--१०----- चा अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाहीत असे कोणाचे म्हणणे असल्यास त्यांनी या वारस जाहीरनाम्याच्या तारखे पासून एक महिन्याच्या आत अगर नेमलेल्या तारखेस ०२/०३/२०२४-- रोजी सदरहू न्यायालयात स्वतः अगर वकिलामार्फत हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्यांचा हक्क शाबीत दिलयास त्याला सदरहू मयत कै.अमोल बबन लोंढे---------- यांचे कायदेशिर वारस प्रमाणपत्र देईल. अशा मजकूराची दवंडी गावात प्रसिध्द ठिक-ठिकाणी व गावच्या चावडी समोर, व मयताच्या घरासमोर देऊन प्रसिध्द केले आहे. तसेच सदर वारस जाहीरनाम्याची एक प्रत गावच्या चावडीच्या नोटीस बोर्डावर व एक प्रत मयताचे घराच्या समोरील दारास डकवून प्रसिध्द केले आहे.

seen AS.

त्याबद्दल मे.कोर्टाचे बेलिफ यांनी दवंडी मजूरी म्हणून मजला रक्कम रुपये-१०/-- (अक्षरी -दहा रुपये) रोख दिले आहे.

म्हणून ही दिली लिहून वारस जाहीरनाम्याची दवंडी पावती.

दि: २८/०२/२०२४

समक्ष
[signature]
बेलिफ.

दवंडीवाला
[signature]
नागनाथ संपत लोंढे
ग्रा.प. कर्मचारी